नि. फौजदारी खटला क्र. **२४४/२०२३**
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी २५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : वैष्णवी सुभाष गौर,
वय : २१ वर्षे,
धंदा : शिक्षण,
राहणार : टाकपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी आरोपी निखील कहार व हर्ष कहार यांना ओळखते. निखील हा माझ्या बहिणीचा पती असुन, हर्ष हा दीर आहे. मी दोन्ही आरोपींना ओळखते ते आजरोजी न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहेत. फिर्यादी काजल कहार ही माझी बहिण आहे. घटना दि. २९/०७/२०२३ रोजी रात्री ११:०० वाजता टाकपुरा भागात माझे घ राजवळ घडली. घटनेवेळी रात्री जेवण करून मी, माझी आई व फिर्यादी असे शतपावली करत होतो. त्याठिकाणी आरोपी क्र. १ आला व त्याने फिर्यादीला मी तुला तलाक देतो असे म्हणाला व मला म्हटला की, मी तुझ्याशी लग्न करतो व तुला पळवुन नेतो. त्यानंतर आरोपी क्र. १ याने मला व फिर्यादीला हात—बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यामुळे त्याठिकाणी माझे वडिल सुभाष गौर व भाउ रोशन गौर हे आले. आरोपी क्र. १ ने माझे भावाला मारले व आरोपी क्र. २ याने लोखंडी रॉडने माझे वडिलांना डोक्यावर मारले. माझे वडिलांना डोक्यावर जबर मार लागल्याने रक्त निघाले व ते बेशुध्द झाले होते. पोलीसांनी मला घटनेबाबत विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. ज्या रॉडने माझे वडिलांना मारहाण झाली तो मला दाखवल्यास मी ओळखु शकते. आता मला मुद्देमाल वस्तु क्र. ‘अ’ वरील लोखंडी रॉड दाखवला. याच रॉडने माझे वडिलांना मारहाण झाली होती. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत.**

२. पोलीसांनी माझे घटनेच्या दोन दिवसानंतर बयान नोंदवले होते. माझे बयान पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आले होते. पोलीसांना बयान देतांना आरोपी क्र. १ याने मला व फिर्यादीला हात—बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली असे मी सांगितले होते. आता मला माझे बयान दाखवले.

त्यामध्ये मला मारहाण केली असे नमुद नाही. पोलीसांना बयान देतांना माझे वडिल बेशुध्द झाले होते असे मी सांगितले होते. आता मला माझे बयान दाखवले. त्यामध्ये असे नमुद करण्यात आलेले नाही. माझे बयानात असे का नमुद करण्यात आलेले नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

३.   आमचे घरापासुन घटनास्थळ १०—१२ घरांच्या अंतरावर आहे. फिर्यादी लग्नानंतर आरोपी क्र. १ सोबत चार वर्षे राहिली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी क्र. १ यांचे आपसांत पटत नसल्यामुळे फिर्यादी एक ते दिड वर्षांपासुन माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी आता आरोपी क्र. १ सोबत संसार करू इच्छित नाही.

४.   हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ कडे बोलेरो पिकअप गाडी होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ हा पुर्वी आमच्या भागात राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ गाडी उभी करून निघत असतांना मी व फिर्यादीने त्याचेसोबत भांडण केले व फिर्यादीला फारकत दे असे त्याला म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने फारकत देण्यास नकार दिला म्हणुन आमची आरोपी क्र. १ सोबत बाचाबाची झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी माझे वडिल व भाउ आले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या गाडीच्या काचा फोडल्या व गाडीचे नुकसान केले. हे म्हणणे खरे नाही की, गाडीची तोड—फोड करत असतांना माझे वडिल गाडीच्या लोखंडी बंफरवर पडले व त्यामुळे त्यांना डोक्याला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने माझे वडिलांना रॉडने मारहाण केली होती हे मी खोटे सांगत आहे. आरोपी क्र. १ याने आम्ही त्याच्या गाडीची तोड—फोड केली या कारणावरून पोलीसांत रिपोर्ट दिला किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी आपल्याविरूध्द कारवाई करू नये म्हणुन आम्ही सर्वांनी ठरवुन आरोपीविरूध्द प्रस्तुतचा खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला व फिर्यादीला हात—बुक्क्यांनी मारहाण तसेच मला पळवुन नेतो असे म्हटला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व वडिलांच्या सांगण्यावरून मी आरोपीविरूध्द खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २९.१०.२०२५  
अकोट

(ए.ए. माळी)  
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,  
(न्यायालय क्र. २)  
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.